a) Cost of material consumed	-	-	-	-	-	-
b) Purchase of stock-in-trade	-	-	-	-	-	-
c) Changes in inventories of finished goods, stock in trade and work-in-progress	-	-	-	-	-	14.64
d) Employee benefits expenses	0.72	0.72	1.90	1.44	3.78	6.88
e) Finance Costs -	-	0.00	-	0.00	-	
f) Depreciation and amortisation expense	0.04	0.04	0.10	0.08	0.19	0.38
g) Other expenses	13.10	6.11	13.98	19.21	20.15	42.13
Total Expenses (IV)	**13.86**	**6.86**	**15.98**	**20.72**	**24.12**	**64.02**
V) **Profit (+) / Loss (-) before Exceptional and Tax (III-IV)**	**(0.36)**	**(6.86)**	**1.40**	**(7.22)**	**10.72**	**16.09**
VI) Exceptional items	-	-	-	-	-	4.35
VII) **Profit (+) / Loss (-) before Tax (V-VI)**	**(0.36)**	**(6.86)**	**1.40**	**(7.22)**	**10.72**	**11.75**
VIII) **Tax Expenses**	**-**	**-**	**0.36**	**0.81**	**6.78**	**7.84**
1) Current Tax	-	-	0.36	-	2.78	3.05
2) (Excess) / Short provision for Tax	-	-	-	-	4.00	-
2) Deffered Tax	-	-	-	0.81	-	4.79
IX) Profit (+) / Loss (-) for the period (VII-VIII)	(0.36)	(6.86)	1.04	(8.03)	3.93	3.91
X) Other Comprehensive Income (OCI)						
i. Items that will not be reclassified to Profit and Loss	-	-	-		-	-
ii. Income Tax relating to Items that will not be reclassified to Profit or Loss	-	-	-		-	-
iii. Items that will be reclassified to Profit or Loss	-	-	-		-	-
iv. Income Tax relating to Items that will be reclassified to Profit or Loss	-	-	-		-	-
Total Comprehensive Income	-	-	-		-	-
XI) **Total Comprehensive Income for the period**	**(0.36)**	**(6.86)**	**1.04**	**(8.03)**	**3.93**	**3.91**
XII) **Paid up Equity Share Capital (Face Value of Rs.10/ each)**	**1,400.00**	**1,400.00**	**1,400.00**	**1,400.00**	**1,400.00**	**1,400.00**
XIII) Other Equity -	-	-	-		-	636.50
XIV) Earnings Per Share (of Rs.10/- each) (not annualised)						
(1) Basic (Rs. Per Share)	(0.00)	(0.05)	0.01	(0.06)	0.03	0.03
(2) Diluted (Rs. Per Share)	(0.00)	(0.05)	0.01	(0.06)	0.03	0.03

Notes:
1 The unaudited financial results for the quarter and half year ended 30th September, 2023 have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meeting held on 10th November, 2023. The unaudited Financial Results are prepared in accordance with Companies (Indian Accounting Standard) Rule, 2015 as prescribed under Section 133 of the Companies Act, 2013.
2 The Company operates only in one segment ie. Infrastructure and Real Estate and all other allied activities revolving around the same. As such there is no other seperate reportable segment as defined by IND AS 108- "Operating Segments."
3 The Figures have been regrouped and/or reclassified wherever necessary.

On Behalf of the Board
PARLE INDUSTRIES LIMITED
(CIN : L21000MH1983PLC029128)
Rakeshkumar Mishra
Exec-Director
DIN: 06919510

Place : Mumbai
Date : 10th November, 2023

सुरतमधील प्रसिद्ध डॉक्टरची स्वतः:च्याच रुग्णालयात आत्महत्या

■ सूरत

सुरतमधील एका प्रसिद्ध डॉक्टरांनी स्वतःच्याच रुग्णालयात इंजेक्शन घेऊन आपले जीवन संपवले. डॉ. उदय कांतीलाल पटेल (५४) असे त्यांचे नाव असून, ते अडाजन पाटिया पटेल नगर सोसायटीत राहत होते. ते एमडी फिजिशियन आणि रांदेर तरवाडी येथील पटेल रुग्णालयाचे मालक होते. त्यांच्या अशा जाण्याने त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकलेले नाही.

डॉ. पटेल यांनी पोटदुखीचे कारण देत त्यांनी कर्मचाऱ्यांना इंजेक्शन देण्यास सांगितले. हे इंजेक्शन घेतल्यानंतर ते उठलेच नाही. यानंतर काही वेळाने त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. डॉ. पटेल यांच्या आत्महत्येमुळे त्यांच्या डॉक्टर मित्रांना आणि भावंडांना धक्का बसला आहे. दरम्यान, डॉ. पटेल यांचा एक मुलगा अमेरिकेत असल्याने तो तेथून परतल्यानंतर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. या आत्महत्येच्या कारणाचा पोलीस तपास करत आहेत.

बडोदा डेअरीच्या अध्यक्षपदी दिनेश पटेल यांची पुन्हा निवड

■ बडोदा

दोन महिन्यांपूर्वी भाजपमध्ये पुन्हा दाखल झालेले माजी आमदार दिनेश पटेल यांची बडोदा डेअरीच्या अध्यक्षपदी पुन्हा निवड झाली आहे. त्यांच्या निवडीनंतर बडोदा डेअरी परिसरात कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष साजरा केला. दूध उत्पादक शेतकऱ्यांवर कधीही अन्याय होणार नसल्याचे दिनेश पटेल यांनी सांगितले.

याआधी दिनेश पटेल यांनी २०१४ ते २०२३ च्या जानेवारीपर्यंत या पदावर काम केले होते. त्यांनी विधानसभा निवडणुकही लढवली होती.

भाजपकडून तिकीट न मिळाल्याने त्यांनी बंडखोरी करत निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत पराभव झाल्यानंतर त्यांनी बडोदा डेअरीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. २ महिन्यांपूर्वी त्यांनी भाजपमध्ये पुन्हा प्रवेश केला होता. त्यांची बडोदा डेअरीच्या अध्यक्षपदावर पुन्हा निवड झाल्याने त्यांच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. या जल्लोषात आमदार चैतन्यसिंह झा हेदेखील सहभागी झाले होते. दरम्यान, दिनेश पटेल म्हणाले की, 'मी २०१४ पासून बडोदा डेअरीच्या अध्यक्षपदावर आहे. मी दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या भल्यासाठी काम केले आहे.

लाहोरमध्ये प्रदुषणामुळे सर्व शाळा, उद्याने, बाजारपेठा बंद

■ लाहोर

जगातील सर्वात प्रदुषित शहर समजल्या जाणाऱ्या पाकिस्तानातील लाहोरमध्ये प्रदुषणाची परिस्थिती

अत्यंत चिंताजनक बनली आहे. प्रदुषणाने निर्माण झालेल्या धुक्यामुळे हजारो लोक आजारी पडले आहेत. त्यामुळे आता कालपासून पुढील चार दिवस म्हणजे १२ नोव्हेंबरपर्यंत शहरातील सर्व शाळा, उद्याने आणि बाजारपेठा बंद ठेवल्या जाणार आहेत.

प्रदुषणामुळे लोक आजारी पडू लागल्याने आता नागरिकांनी कोरोना काळासारखा मास्क वापरावा आणि आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावे, अन्यथा तूर्तास घरीच रहावे, असा सल्ला लाहोरच्या प्रसिद्ध मेयो रुग्णालयाचे डॉ. सलमान काझमी यांनी शहरातील नागरिकांना दिला आहे. डॉ. काझमी पुढे असेही म्हणाले की, लोकांना या वाढत्या प्रदुषणामुळे श्वासाच्या समस्येप्रमाणेच संसर्ग होऊन डोळ्यांना आणि त्वचेला त्रास होण्याची शक्यता आहे.

पिकांचे अवशेष जाळण्याचे प्रमाण वाढल्यामुळे प्रदुषण मोठी भर पडली असल्याचे बोलले जात आहे. वास्तविक लाहोर शहर हे मुघल काळात उद्यानाचे शहर म्हणून ओळखले जात होते, पण आता या शहराची सर्वात प्रदुषित शहर अशी ओळख तयार झाली आहे.

'अॅपल'चे सह-संस्थापक स्टिव्ह वोझ्नियाक रुग्णालयात दाखल

■ मेक्सिको सिटी

अॅपलचे सह-संस्थापक स्टिव्ह वोझ्नियाक यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मेक्सिको सिटीमध्ये त्यांची प्रकृती खालावली. मीडिया रिपोर्ट्सनुसार, स्ट्रोक आला असल्याची शक्यता असल्याने त्यांना स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

७३ वर्षांचे अॅपलचे सह-संस्थापक स्टिव्ह वोझ्नियाक हे मेक्सिकोमध्ये वर्ल्ड बिझनेस फोरमच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आले होते. स्थानिक वेळेनुसार ४.२० मिनिटांनी ते भाषण करणार होते. मात्र त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्यांना कोणत्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, हे अद्याप समजू शकलेले नाही. स्टिव्ह जॉब्स आणि स्टिव्ह वोझ्नियाक यांनी १ एप्रिल १९७६ रोजी अॅपल सुरू केले. वोझ्नियाक हे ईलेक्ट्रॉनिक अभियंता आणि संगणक प्रोग्रामर म्हणूनही ओळखले जातात. ५ ऑक्टोबर २०११ रोजी अॅपलचे सह-संस्थापक स्टिव्ह जॉब्स यांचे निधन झाले आहे.

देश विदेश

विधेयके मंजूर करण्यात दिरंगाई करू नका

पंजाबचे राज्यपाल पुरोहित यांना सुप्रीम कोर्टाने फटकारले

■ नवी दिल्ली

'कृपया विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकांच्या अमलबजावणीत अडथळा आणू नका. नियमानुसार जनतेतून निवडून आलेल्या विधिमंडळाने ही विधेयके मंजूर केली आहेत. आपण खरेच एक संसदीय लोकशाही म्हणून काम करणार आहोत का, याचा विचार करा. हा एक खूप गंभीर प्रकार आहे,' अशा शब्दांत न्यायालयाने बनवारीलाल पुरोहित यांना सुनावले. प्रलंबित विधेयकांच्या मुद्यावरून राज्य सरकारने राज्यपाल बनवारीलाल पुरोहित यांच्याविरोधात थेट सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. या याचिकेवर सुनावणीवेळी न्यायालयाने राज्यपालांच्या कार्यपद्धतीवरून ताशेरे ओढले.

विधेयके मंजूर करण्यासाठी राज्य सरकारने बोलावलेले विधिमंडळ अधिवेशन बेकायदा होते, असे म्हणत राज्यपालांनी काही महत्त्वाची विधेयके प्रलंबित ठेवली आहेत. त्यावरूनही न्यायालयाने राज्यपालांना खडसावले. तुम्ही आगीशी खेळत आहात. राज्यपाल असे म्हणूच कसे शकतात. देशात लोकशाही आहे की नाही, तुम्ही कोणत्या अधिकाराखाली विधिमंडळाचे अधिवेशन बेकायदा ठरवत आहात? विधानसभा अध्यक्ष अधिवेशन बोलावतात. राज्यपालांना अधिवेशन स्थगित करण्यासंदर्भात निर्णय घेण्याचा कोणताही अधिकार नाही.

दिवाळीनंतर कचरा साफ करा सिंगापूरमध्ये पोस्टर! नंतर हटवले

■ सिंगापूर

दिवाळी सण जगभर साजरा होतो. सिंगापूरमध्ये भारतीयांची संख्या मोठी असल्याने या देशातही तो उत्साहात साजरा केला जातो. मात्र दिवाळीवरून तिथे लावलेल्या एका पोस्टरमुळे वाद निर्माण झाला आहे. माऊंटबॅटन ग्रासरूट ऑर्गनायझेशन या संस्थेचे सल्लागार आणि खासदार लिम बायो चुआँन यांनी हे पोस्टर लावले आहे. या पोस्टरवर नागरिकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. परंतु त्यावर दिवाळीनंतर होणारा कचरा साफ करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. सिंगापूरच्या राष्ट्रीय पर्यावरण विभागाने या पोस्टरला मान्यता दिली होती, असेही सांगितले जात आहे. सिंगापूर देश आपल्या स्वच्छतेसाठी जगभर प्रसिद्ध आहे. या पोस्टरची सोशल मीडियावर चर्चा झाल्यावर हे पोस्टर हटवण्यात आले. चुआँन यांनी असा खुलासा केला की, केवळ गैरसमज होऊ नये म्हणून त्यांनी हे पोस्टर हटवले आहे. दरम्यान सिंगापूरमधील भारतीय रविवारी दिवाळी सण साजरा करणार आहेत.

पाकिस्तानमधील दहशतवादी हल्ल्यांमध्ये ६० टक्क्यांनी वाढ

■ इस्लामाबाद

अफगाणिस्तानमध्ये सत्ता ताब्यात घेणाऱ्या तालिबानचे एकेकाळी समर्थन करणाऱ्या आणि अनेक दहशतवादी संघटनांचे पालनपोषण करणाऱ्या पाकिस्तानला दहशतवादाचा चांगलाच दणका बसला आहे. काबूलमध्ये तालिबानची सत्ता आल्यापासून पाकिस्तानमधील दहशतवादी हल्ल्यांचे प्रमाण ६० टक्क्यांनी वाढले असल्याची कबुली पाकिस्तानचे हंगामी पंतप्रधान अन्वारुल हक काकर यांनी दिली आहे.

कट्टर इस्लामवादी असलेल्या तालिबानने ऑगस्ट २०२१ मध्ये अफगाणिस्तानची सत्ता ताब्यात घेतली होती. यामुळे पाकिस्तानला विरोध करणाऱ्या दहशतवादी गटांवर, विशेषतः तेहरिके तालिबान पाकिस्तानसारख्या संघटनांवर कारवाई होण्याची

पाक पंतप्रधानांची कबुली

आणि पाकिस्तानविरोधातील कारवाईसाठी अफगाणिस्तानच्या भूमीचा वापर न होण्याची आशा पाकिस्तान सरकारला वाटली होती. मात्र, पाकिस्तानमध्ये शांतता निर्माण होण्याऐवजी मागील दोन वर्षांत दहशतवादी हल्ल्यांचे प्रमाण ६० टक्क्यांनी आणि आत्मघाती हल्ल्यांचे प्रमाण ५० टक्क्यांनी वाढल्याची खंत हंगामी पंतप्रधान काकर यांनी व्यक्त केली आहे.

मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीत केवळ १० टक्के महिलांना उमेदवारी

■ भोपाळ

मध्य प्रदेशातील विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. यंदा निवडणुकीसाठी फक्त १० टक्के महिला उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. यामध्ये काँग्रेस पक्षाने ३० महिलांना तर भाजपने २७ महिलांना उमेदवारी दिली आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म व मध्य प्रदेश इलेक्शन वॉच या सामाजिक संस्थांनी यासंदर्भातील एक अहवाल तयार

केला आहे. त्यामध्ये ही माहिती दिली आहे. या अहवालात विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरलेल्या सर्व २,५३४ उमेदवारांनी त्यांच्या शपथपत्रांसह सविस्तर माहिती दिली आहे.

या संघटनेचे एक सदस्य अरुण गुप्तू यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, राजकीय पक्ष नेहमीच महिलांना विधानसभेत आरक्षण देण्याबाबत जोरजोरात बोलतात. परंतु जेव्हा ते लागू करण्याची वेळ येते, तेव्हा त्यापैकी कोणीही त्याचे पालन करत नाही. यावर्षी, मध्य प्रदेश निवडणुकीत एकूण २,५३४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. त्यापैकी केवळ २५३ महिलांना विविध राजकीय पक्षांनी तिकीट दिले आहे.

जीबी पारसिक सहकारी बँकेने संस्थापक अध्यक्ष गोपीनाथ शिवराम पाटील यांच्या ८४ व्या जयंती दिनानिमित्त अलीकडेच बँकेचे सभासद आणि कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आणि रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी १५० जणांची आरोग्य तर १३० जणांची नेत्रतपासणी करण्यात आली. १२८ जणांनी रक्तदान केले. शिबिरात बँकेचे व्यवस्थापकीय मंडळाचे अध्यक्ष रणजित पाटील, संचालक विक्रम पाटील आणि अन्य उपस्थित होते.

मंत्रालयात समांतर वैद्यकीय मदत कक्ष उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लक्ष ठेवणार

■ मुंबई

मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या देखरेखीखाली सुरू असलेल्या वैद्यकीय सहाय्यता कक्षाबरोबर आता उपमुख्यमंत्री आणि विधि व न्याय मंत्री देवेंद्र फडणवीस गरीब रुग्णांना चांगले उपचार मिळावे यासाठी एक स्वतंत्र कक्ष सुरू करत आहेत. या कक्षाचे काम पूर्ण झाले असून, लवकरच गरीब रुग्णांसाठी हा कक्ष सुरू होणार आहे.

गरीब रुग्णांना योग्य उपचार मिळावेत यासाठी धर्मादाय रुग्णालयांत विशिष्ट प्रमाणात बेड आरक्षित असतात. मात्र, काही रुग्णालये याचे पालन करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे रुग्णालयांतील गरिबांसाठी राखीव बेड सरकारमार्फत मिळावेत. त्यासाठी त्यांना मदत व्हावी म्हणून राज्यस्तरीय मदत कक्ष निर्माण करण्यात आला आहे. हा मदत कक्ष हा विधी व न्याय विभागाच्या अखत्यारीत कार्यरत राहणार आहे. मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा प्रकारे कक्ष सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग, मुंबई.
ई-निविदा सूचना क्रमांक : ३५/२०२३-२४

कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, मुंबई हे सा. बां. विभागात नोंदणीकृत / अनुभवी ठेकेदार यांचेकडून कामांच्या ऑनलाईन ई-निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना कार्यकारी अभियंता, https://mahatender.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १३.११.२०२३ वेळ दुपारी ०१.०० ते २१.११.२०२३ वेळ दुपारी ०१.०० पर्यंत ऑनलाईन डाऊनलोड करण्यांकरिता उपलब्ध होतील. तसेच शक्य असल्यास ऑनलाईन ई-निविदा कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई हे दिनांक २२.११.२०२३ वेळ दुपारी ०२.०० वाजता उघडतील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकारांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टीप : निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारांनी क्लास B-1 व त्यावरील डिजिटल सिग्नेचर आणि वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर निविदा संदर्भात सर्व दस्ताऐवज ऑनलाईन सादर करणेकरिता स्वत: नाव नोंदणी करून घ्यावी. वरील निविदा सूचनेमध्ये एकूण ०२ कामे समाविष्ठ असून सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर निविदा सूचना पहावयास मिळेल. कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास नोटीसची प्रत विनामुल्य मिळू शकेल.

(उपरोक्त काम हे १० लाखांच्या वरील आहे.)

जा.क्र. काअ/दमुंविवि/निविदा/५८३१/२०२३-२४ दि. ०७.११.२०२३

सही/-
कार्यकारी अभियंता,
दक्षिण मुंबई विद्युत विभाग,
सा. बां. विभाग, मुंबई.

क्रमांक : आरओसी-२०२३-२४/क्र-५/सी ४८६१

ए. बी. एंटरप्राईझेस

आम्ही श्री. मनोहरलाल बंग, श्रीमती. आनंदी बंग आणि श्रीमती. कावेरी बंग ए. बी. एंटरप्राईझेस चे भागीदार, लोकांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, अलिकडच्या काळात काही अनोळखी व्यक्ति (नाव अज्ञात) ऑनलाईन B2B पोर्टल चे नाव वापरून आमच्या फर्मचे नाव, जीएसटी क्रमांक आणि नोंदणीकृत पत्ता दिशाभूल करण्यासाठी बेकायदेशीरपणे वापरत आहेत, आणि आमच्या कंपनीचे नाव व जीएसटी क्रमांक असलेले बोगस इनव्हॉइस जारी करून व्यवसायिक क्रियाकलापांमध्ये व्यवहार करून ग्राहकांकडुन पैसे घेत आहेत. आमच्या नावाचा वापर करून अशा व्यक्तींनी जारी केलेले बोगस चलन पूर्णपणे बेकायदेशीर आणि फसवे आहे आणि अशा चलनांना कोणतेही कायदेशीर स्थान असणार नाही. अशा चुकीच्या माहितीमुळे बाजारपेठेत आमची गुणवत्ता व सदभावनेचा भ्रमनिरास होत आहे. जर कोणाकडे अश्या प्रकारचे इनव्हॉइसेस आले तर कृपया पुढाकार घ्या किंवा योग्य प्रधिकरणासमोर योग्य ती कायदेशीर कारवाही करा. आणि पुढे आम्हाला असे सांगायचे आहे की आम्ही समोरच्या व्यक्तीच्या सर्व पैश्यांची किंवा साहित्याच्या कोणत्याही नुकसानीसाठी आमचे कर्मचारी किंवा आमच्या फर्मचा कोणताही भागीदार जबाबदार राहणार नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
मुदतवाढ सूचना
ई-निविदा सूचना क्र. ७६/२०२३ - २०२४ (मुंबई) करीता

दिनांक २६/१०/२०२३ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक मुंबई तरुणभारत, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई-निविदा सूचनेतील खालील कामाकरीताच्या ई-निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

अ. क्र.	कामाचे नांव
१.	टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती...टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील ६०० मि. मी. व्यासाच्या डीआय प्रकारच्या जलवाहिनीची दुरुस्ती करणे.

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक १३/११/२०२३ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करून किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे. याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

जावळीतील नाचणीच्या कुरुंबीचा फराळ थेट अमेरिकेला जाणार!

■ कराड

सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील कुसुंबी हे नाचणीचे गाव म्हणून ओळखले जाते. याच गावातील महिलांनी एकत्र येऊन नाचणीपासून बनविलेल्या विविध पदार्थांचा दिवाळी फराळ आता थेट अमेरिकेला जाणार आहे. या गावातील महिलांनी महिला फूड प्रोसेसिंग कंपनी स्थापन केली असून, या कंपनीच्या माध्यमातून हा फराळ अमेरिकेला पाठविला जाणार आहे. या महिलांच्या कंपनीने नाचणीपासून पौष्टिक लाडू, शेवया, चिवडा, भडंग, बिस्किटे, मिठाई आणि केक आदींसारखे पदार्थ बनविले आहेत. नुकतीच या कंपनीला शुद्ध नाचणीपासून बनविलेल्या दिवाळी फराळाची ऑर्डर मिळाली आहे. येत्या दोन दिवसांत हा फराळ अमेरिकेला रवाना केला जाणार आहे.

इमारतीला आग महिलेचा मृत्यू

मुंबई- मुंबईतील विलेपार्ले पूर्व येथील न्यू पुनम बाग इमारतीला भीषण आग लागून हर्षदा बेन ठाकूर या ९६ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. तर काही जण जखमी झाले. अग्निशमन दलाच्या ५ बंबांनी घटनास्थळी येऊन ही आग विझविली. आगीचे कारण समजू शकले नाही. या आगीत काही लोक जखमी झाले असून त्यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या आगीमुळे परिसरात घबराट माजली होती.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

E-TENDER NOTICE

MSEDCL, Vashi Circle is inviting e-Tenders from the experience electrical Contractors in the field for the Work on full turnkey basis in Vashi division, under O&M Scheme as mentioned below.

Sr. No.	Tender No.	Description	Tender Amount in Lakhs
1.	SE/VC/T-23/2023-24	The work of Supply, Erection, Testing & Commissioning of 11 KV underground Cable, RMU & DTCs for Power Evacuation from new 22/11 KV Rabale Substation for **Ghansoli Area** under Ghansoli Section, in Vashi division, under Vashi Circle under SSMR Scheme	605.92
2.	SE/VC/T-24/2023-24	The work of Supply, Erection, Testing & Commissioning of 11 KV underground Cable, RMU & DTCs for Power Evacuation from new 22/11 KV Rabale Substation for **Ghotivali Area** under Ghansoli Section, in Vashi division, under Vashi Circle under SSMR Scheme	594.99

The tenders will be processed only in electronic tendering mode and opened for registered agencies on e-Tendering system for works contact of MSEDCL. The Bid documents will be available from **10-11-2023 to 28.11.2023**. The last date for uploading of e-Tenders is **28.11.2023 up to 15.00 hrs**. For more details regarding registration process and tender visit our Company's website e-Tendering web site **http:/ /www.mahadiscom.in. Contact person** Executive Engineer (Adm), Vashi Circle, Vashi Mobile No. **8879625012**. The undersigned reserves all the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

Superintending Engineer,
MSEDCL,
Vashi Circle.

PRO No.383/2023-24

फॉर्म बी
जाहीर उद्घोषणा
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)

कॉक्स अॅण्ड किंग्ज ग्लोबल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)च्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता

अ.क्र.	वर्णन	तपशील
१.	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	कॉक्स अॅण्ड किंग्ज ग्लोबल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)
२.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक	२१ मार्च, २०११
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले	कंपनी निबंधक - मुंबई
४.	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक	U63040MH2011PTC215069
५.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता	टर्नर मॉरिसन बिल्डींग, १ ला मजला, १६, बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत ४०००01.
६.	दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक	०९ नोव्हेंबर, २०२३
७.	कॉर्पोरेट कर्जदाराचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक	०९ नोव्हेंबर, २०२३
८	परिसमापक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता	राजकुमार फेरू गुप्ता नोंद. क्र. : IBBI/IPA-001/IP-P-02103/2020-2021/13247
९	मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल	५०२ बी, हॅमिल्टन कोर्ट, रहेजा रिफ्लेक्शन्स, ठाकूर व्हिलेज, बोरीवली पूर्व, प.द्रु.महामार्गाजवळ, मुंबई - ४०००६६. rf.gupta86@gmail.com
१०	परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल	राजकुमार फेरू गुप्ता कंचनसोभा डेब्ट रेसॉल्यूशन ॲडव्हायजर्स प्रा. लि. पत्ता: युनिट क्र. २०७, क्षितिज, आझाद नगर मेट्रो स्टेशन-जवळ, वीरा देसाई मार्ग, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००५३. liquidationcoxandkings@gmail.com
११	दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक	९ डिसेंबर, २०२३

याद्वारे सूचना देण्यात येते की, मान. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी दि. ०९ नोव्हेंबर, **२०२३** रोजी **मे. कॉक्स ऑण्ड किंग्ज ग्लोबल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)**चे परिसमापन सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.

मे. कॉक्स ऑण्ड किंग्ज ग्लोबल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)च्या भागधारकांना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. **०९ डिसेंबर, २०२३** रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापकाकडे बाब क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

राजकुमार फेरू गुप्ता
परिसमापक
दिनांक : १० नोव्हेंबर, २०२३
ठिकाण : मुंबई
कॉक्स ऑण्ड किंग्ज ग्लोबल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, **१) सौ. सावता विनोद जैन, २) दिवंगत विनोद खिमराज जैन आणि ३) सोहन विनोद जैन** यांनी माझगाव विभागाच्या सी.एस. क्र. ७७४ धारण केलेल्या मालमत्तेवर उभी, ३४, क्रांतिवीर भाई बाळमुकुंद मार्ग, चिंचपोकळी पूर्व, मुंबई - ४०० ०१२ येथे स्थित चंद्र दर्शन हाईट्स या इमारतीमधील ८ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ०८०३, मोजमाप ५७.१३ चौ. मी. कार्पेट क्षेत्रफळ (सदर सदनिका) दिनांक १९.०७.२०१८ रोजीच्या नोंदणीकरण करारपत्र क्र. बीबीई२-९०००-२०१८ नुसार संयुक्तरित्या खरेदी केली होती.

वरील मालकांपैकी एक, **श्री. विनोद खिमराज जैन** यांचे दि. ०३.०२.२०२३ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात **श्रीमती सावता विनोद जैन, सौ. डेझी यश झोटा** उर्फ कु. डेझी विनोद जैन आणि **श्री. सोहन विनोद जैन** हे त्यांचे केवळ कायदेशीर वारस आहेत. तथापि, दिनांक ०१.११.२०२३ रोजीच्या नोंदणीकृत हक्कसोड करारनामा क्र. बीबीई२-२२४७३-२०२३ नुसार, ज्याद्वारे **सौ. डेझी यश झोटा** उर्फ कु. डेझी विनोद जैन यांनी कृपापूर्वक त्यांचे सदर सदनिकेचे वारसा हक्क त्यांची आई, सौ. सावता विनोद जैन आणि त्यांचा भाऊ, श्री. सोहन विनोद जैन यांच्या नावे समप्रमाणात सोडले आहेत.

उपरोल्लेखित सदनिका किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात वारसा, हिस्सा, विक्री, गहाणवट, भाडेपट्टी, धारणाधिकार, परवाना, भेट, ताबा, अदलाबदल, तारण, नियुक्ती, हमी, न्यास, मृत्युपत्र, भाडेकरू, शीर्षकाचे हस्तांतरण किंवा लाभार्थी हितसंबंध, पोट-भाडेकरू, प्रभार, प्रलंबित कायदेशीर कारवाई, देखभाल, वहिवाट, न्यायालयीन आदेश किंवा बोजा कशाही प्रकारे किंवा अन्यथा या मार्गे कोणताही दावा/दावे असणाऱ्या सर्व व्यक्ती/व्यक्तींनी त्याबाबत असा दावा लिखित स्वरुपात, सर्व सहाय्यक कागदपत्रांच्या मूळ प्रमाणित प्रतिसह सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत निम्नस्वाक्षरीकारांना सूचित करण्याची मागणी करण्यात येत आहे, असे न केल्यास, अशा व्यक्तींचे दावे, जर असल्यास स्वेच्छेने गुंडाळून ठेवले, सोडून दिले असे समजण्यात येईल आणि आमच्या अशिलांवर बंधनकारक नसतील.

दिनांकः ११.११.२०२३
ठिकाणः मुंबई
सही/-
रोहित वसंत शिंदे
ॲडव्होकेट उच्च न्यायालय
११८, १ला मजला, नारायण उद्योग भवन,
चिवडा गल्ली, लालबाग,
मुंबई - ४०० ०१२.

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, **श्री. हेमल सुरती आणि सौ. सरेत्ता हेमल सुरती** जे, वाणिज्य युनिट क्र. २०१, २ रा मजला, मोजमाप ४२३.५० चौ.फू. बिल्ट-अप क्षेत्रफळ आणि तिचा लॉफ्ट/आनुषंगिक योग्यरित्या मंजूर क्षेत्र, इमारत "कोणार्क श्रम" व त्यासह सदर इमारतीच्या पहिला मजला पोडियमवर स्थित १ (एक) कार पार्किंग जागा क्र. १०४ च्या वापराचे अनन्य अधिकार व त्यासह "राजा बहादूर मोतिलाल बॉम्बे मिल्स प्रायव्हेट लिमिटेड"च्या भाग प्रमाणपत्र क्र. सीओएनएस/५/२००२ अन्वये असलेले डिस्टिंक्टिव्ह क्र. ०१७८८ ते ०२२९७, (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. १००/- प्रत्येकी दर्शनी मूल्याचे ५१० (पाचशे दहा) पूर्णतः भरणा केलेले इक्विटी समभाग (**"एकत्रितरित्या सदर जागा"**) चे मालक आहेत, त्यांच्या शीर्षकाची आम्ही तपासणी करीत आहोत आणि सदर जागा मलबार आणि कंबाला हिल विभागाच्या कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. ७२८ धारण केलेल्या मालमत्तेवर बांधलेली असून १५६, पंडित मदन मालविय मार्ग, ताडदेव, मुंबई - ४०० ०३४ येथे स्थित आहे आणि सदर जागा स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँकेच्या गहाणवटीसह आणि त्याव्यतिरिक्त सर्व बोजे, प्रभार, विवाद, दावे, धारणाधिकार किंवा गहाणवटीपासून मुक्त आहे.

उपरोल्लेखित जागा किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात वारसा, हिस्सा, विक्री, गहाणवट, भाडेपट्टी, धारणाधिकार, परवाना, भेट, ताबा, अदलाबदल, तारण, नियुक्ती, हमी, न्यास, मृत्युपत्र, भाडेकरू, शीर्षकाचे हस्तांतरण किंवा लाभार्थी हितसंबंध, पोट-भाडेकरू, प्रभार, प्रलंबित कायदेशीर कारवाई, देखभाल, वहिवाट, न्यायालयीन आदेश किंवा बोजा कशाही प्रकारे किंवा अन्यथा या मार्गे कोणताही दावा/दावे असणाऱ्या सर्व व्यक्ती/व्यक्तींनी त्याबाबत असा दावा लिखित स्वरुपात, सर्व सहाय्यक कागदपत्रांच्या मूळ प्रमाणित प्रतिसह सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत निम्नस्वाक्षरीकारांना सूचित करण्याची मागणी करण्यात येत आहे, असे न केल्यास, अशा व्यक्तींचे दावे, जर असल्यास स्वेच्छेने गुंडाळून ठेवले, सोडून दिले असे समजण्यात येईल आणि आमच्या अशिलांवर बंधनकारक नसतील.

दिनांकः ११.११.२०२३
ठिकाणः मुंबई
सही/-
रोहित वसंत शिंदे
ॲडव्होकेट उच्च न्यायालय
११८, १ला मजला, नारायण उद्योग भवन,
चिवडा गल्ली, लालबाग,
मुंबई - ४०० ०१२.